# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सध्दर्म : त्रैमासिक** |
| संचालक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| प्रकाशक | : | कर्नाटक प्रकाशन संस्था, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १९६७ |
| वर्ष | : | दुसरें |
| अंक | : | दुसरा |
| पृष्ठे | : | १६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ७**

सद्धर्म प्रकाशन

# सद्धर्म

त्रैमासिक

संचालक
गुंडोपंत हरिभक्त

वर्ष दुसरें
अंक दुसरा
चैत्र, १८८९
एप्रिल, १९६७
वार्षिक वर्गणी
एक रुपया
किरकोळ अंक
पंचवीस पैसे

## ह्या अंकांत....

जेथें असाल तेथें नमस्कार २
खरा मार्ग : सामुदायिक ध्येय ३
इथें तर चोरांचा सुकाळ ११
पलटों आकाश थोडें १२
विचार करण्यासाठीं गोष्ट १३
राजांच्या दरबारांतून १४
राजाचें बळ १४
सर्वांरंभीं मंगल १५
व्याकरणाचा पाठ १५

ह्या त्रैमासिकांतील मजकूर संचालकांच्या परवानगी-शिवाय कोणींही कोठेंही छापूं नये अशी विनंती आहे.

## एक नवा संप्रदाय

"Expansion is life, contraction is death. Love is life and hatred is death. We commenced to die the day we began to hate other races, and nothing can prevent our death, unless we come back to expansion, which is life."

—Swami Vivekanand,
*18 November, 1894.*

द्वेष हा अग्नीसारखा आहे. एकदा का त्यानें तुमच्या मनांत पेट घेतला, कीं तुमचें भस्म केल्यावांचून तो केव्हांही शमणार नाहीं.

म्हणूनच स्वामी विवेकानंदांनीं 'द्वेष म्हणजे मृत्यु' असें वरील उताऱ्यांत लिहून म्हटलें आहे.

पण आज दुर्दैवानें 'द्वेष करा' हें आपलें ब्रीदवाक्य बनलें असून, आपसांत द्वेष वाढविणाऱ्यांचा जणूं एक नवा संप्रदायच भारतांत निर्माण होत आहे.

अशा वेळीं स्वामीजींचा वरील इशारा मनांत बाळगणें अगदीं अवश्य आहे.

त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।
वेत्तासि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप ॥ ३८ ॥
वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥३९॥

तूं प्रकृतिपुरुषांचिया आदि । जी महत्तत्त्वा तूंचि अवधि । स्वयें तूं अनादि । पुरातनु ॥ १४ ॥ तूं सकळ विश्वजीवन । जीवांसि तूंचि निधान । भूतभविष्याचें ज्ञान । तुझ्याचि हातीं ॥ १५ ॥ जी श्रुतीचिया लोचना । स्वरूपसुख तूंचि अभिन्ना । त्रिभुवनाचिया आयतना । आयतन तूं ॥ १६ ॥ म्हणोनि जी परम । तूंतें म्हणिजे महाधाम । कल्पांतीं महद्ब्रह्म । तुजमाजी रिगे ॥ १७ ॥ किंबहुना तुवां देवें । विश्व विस्तारिलें आहे आघवें । तरि अनंतरूपा वानावें । कवणें तूंतें ॥ १८ ॥ जी काय एक तूं नव्हसी । कवणे ठायीं नससी । हें असो जैसा आहासी । तैसिया नमो ॥ १९ ॥ वायु तूं अनंता । यम तूं नियमिता । प्राणिगणीं वसता । अग्नि तो तूं ॥ २० ॥ वरुण तो सोम । स्रष्टा तूं ब्रह्म । पितामहाचाही परम । आदि जनक तूं ॥५२१ ॥ आणीकही जें जें कांहीं । रूप आथी अथवा नाहीं । तया नमो तुज तैसयाही । जगन्नाथा ॥ २२ ॥

तुम्ही पुरातन असून तुमच्या पूर्वीचा असा दुसरा कोणी नाहीं. १४. तुम्ही सर्व विश्वाचे चालक व सर्व जीवांचें अधिष्ठान असून, भूत व भविष्य हें ज्ञान तुम्हांलाच आहे. १५. श्रुतींच्या नेत्रांस ज्या स्वरूपापासून सुख होतें, तें, भेदरहित असे जे तुम्ही, त्या तुमचेंच होय; व ज्या मायेनें हें सर्व जग व्यापलें आहे, तिचा आश्रयही तुमचाच आहे. १६. म्हणून तुम्ही सर्व सृष्टीचें आश्रयस्थान असून परमश्रेष्ठ आम्हां व ब्रह्मांडाच्या अंतकाळीं नाशाही तुमच्याच ठिकाणीं लय पावते. १७. किंबहुना देवा, हें सर्व जग तुम्हींच विस्तारलें आहे. तेव्हां, अनंतरूप असे जे तुम्ही, त्या तुमचें वर्णन कोण करूं शकेल ? १८. तुम्ही ज्यांत नाहीं, अशी ह्या जगांत कोणती वस्तु आहे ? व तुम्ही नाहीं असें कोणतें ठिकाण आहे ? तेव्हां, तुम्ही जेथें जेथें असाल, तेथें तेथें तुम्हांला माझा नमस्कार असो. १९. श्रीअनंता, तुम्ही वायु आहां. शासन करणारा जो यम, तो तुम्ही आहां. प्राणीमात्राच्या ठिकाणीं वास करणारा जो जठराग्नि, तोही तुम्ही आहां. ५२०. तुम्ही वरुण, चंद्र व सृष्टि निर्माण करणारे ब्रह्मदेव आहां व ब्रह्मदेवालाही जो उत्पन्न करणारा, तोही तुम्हीच आहां. २१. श्रीजगन्नाथा, ह्याशिवाय इतर म्हणून ज्या आपल्या विभूति आहेत, त्यांना आकार असो वा नसो, त्यांना माझा नमस्कार असो. २२.

—श्रीज्ञानेश्वरी

अध्याय ११, ओव्या ५१४—२२

श्रीनानामहाराज साखरे आवृत्ति

# खरा मार्ग : सामुदायिक ध्येय

"मनु जर आज आमच्या भूमींत पुन्हा अवतरला, तर आपण परक्या स्थळीं आलों आहों, असें त्यास मुळींही वाटणार नाहीं. पूर्वकाळचे कायदे आजही अस्तित्वांत असल्याचें त्याला आढळून येईल. हजारों वर्षांच्या अनुभवानें त्या कायद्यांना स्थैर्य प्राप्त झाल्याचें त्यास दिसेल. हजारों वर्षें तावून-सुलाखून पक्क्या बनलेल्या चालीरीती त्रिकालाबाधित निसर्गनियमांप्रमाणें अचल असल्याचें त्याच्या अनुभवाला येईल. आज हजारों वर्षें काळाचे प्रचंड तडाखे आमच्या चालीरीती खात आल्या आहेत. पण ह्या तडाख्यांचा परिणाम इतकाच झाला, कीं त्या अधिक बळकट आणि अधिक चिवटमात्र झाल्या आहेत."[१]

हे उद्गार स्वामी विवेकानंदांनीं ता. १६ जानेवारी, १८९७ रोजीं पाश्चात्य देशांतील आपली कामगिरी संपवून स्वदेशीं परत आल्यावर काढलेले आहेत.

आज सत्तर वर्षांनीं, मनु राहूं द्या, पण स्वतः स्वामीजीच भारतभूमींत पुन्हा अवतरले, तर त्यांना काय दिसेल? त्यांच्यावेळच्या कायद्यांच्या जागीं अगदीं वेगळे कायदे आणि त्यांच्यावेळच्या चालीरीतींच्या जागीं अगदीं वेगळ्या प्रकारच्या चालीरीती त्यांना भारतांत दिसून येतील. आणि तें पाहून, "हा माझा भारत नव्हे, हा माझा भारत नव्हे, हा युरोप-अमेरिकेचा कुठलातरी मागासलेला भाग आहे" असें म्हणत ते त्याच पावलीं मागें फिरतील.

पण आपणमात्र स्वामीजींस जरूर म्हणूं, "नाहीं, स्वामीजी नाहीं, असे रागावूं नका. जरा धीर धरा. ही आपलीच प्रिय भारतभूमि आहे. आपल्याला ओळख पटेल असं दुसरं कांहीं इथें आतं उरलं नसलं, तरी ह्या पाहा पूर्वीच्याच असंख्य जाती. त्यांत जराही फरक झालेला नाहीं. ह्या जाती पाहून तरी आपण आपल्या भारतांतच उभे आहांत, अशी आपली खात्री होईल. स्वामीजी, आम्ही निर्वाळा देतों, हा आपला भारतच आहे."

आज भारतांत आहार-विहार, आचार-विचार सर्वच बाबतींत आमूलाग्र फरक झाला आहे. पण मौज ही आहे, कीं आपल्यांतील जाती निर्दय, अमानुष आणि अनैतिक आहेत, असें आपल्या पाश्चात्य मानभावी हितचिंतकांनीं[२] गेल्या शतकांत आपल्याला दाखवून दिल्यापासून, त्यांच्या पायींच आपण पारतंत्र्यांत पडलों, भारताला लागलेला तो एक कलंक आहे, जाती नाहींशा झाल्या पाहिजेत, असें आपल्याला मनापासून वाटत आलें असूनही, अजून त्या पूर्ववत् कायमच आहेत.

जाती नाहींशा व्हाव्यात, म्हणून आपण सहभोजनें केलीं, मिश्रविवाह लावले, सभा बोलावल्या, सह्या घेतल्या, मागासलेल्यांना पुढें केलें, पुढारलेल्यांना मागें सारलें, नाना प्रकार केले. पण राम शिवा गोविंदा. जाती म्हणून कांहीं नाहींशा झाल्या नाहींत. उलट त्या वाढल्याच आहेत.

१. "स्वामी विवेकानंद ह्यांचे समग्र ग्रंथ", जन्म-शताब्दि आवृत्ति, खंड १२, पृष्ठ ४४. कर्नाटक प्रकाशन

2. "Not until Christian criticism was brought to bear at the beginning of the 19th century was there any definite attempt made to show that caste as a social system is cruel, inhuman and immoral."

—Farquhar: *An outline of religious literature of India*, p. 325.

अशा प्रकारें चिवट असलेल्या ह्या जाती म्हणजे खरोखरी काय प्रकार आहे, हें नीट ध्यानांत येण्यासाठीं त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमि सावंत डोळ्यांपुढें असणें अवश्य आहे.

आपला बराचसा प्राचीन इतिहास पुराणांतील कथांच्या मागें दडलेला आहे. त्याला प्रकाशांत आणलें असतां प्रथम शरयू नदीच्या कांठीं वसलेलें कोसलचें राज्य आपल्या दृष्टीस पडतें. विवस्वान् नांवाच्या एका पराक्रमी पुरुषानें त्या प्रदेशांतील सर्व जातींच्या लोकांवर स्वामित्व संपादून तें स्थापन केलें होतें. त्यांत वसिष्ठ नांवाच्या एका बुद्धिमान् पुरुषाचें त्याला साहाय्य होतें. विवस्वानानें शांतता स्थापून, प्रजेला स्थैर्य आणिलें आणि वसिष्ठानें[३] यज्ञाची सुरुवात करून, तिला प्रगतीचा मार्ग दाखवून दिला.[४]

विवस्वानानंतर मनु झाला. मनूच्या पुत्रपौत्रांनीं कोसलच्या बाहेर वैशाली, विदेह, प्रतिष्ठान, गय, उत्कल, वगैरे राज्यें स्थापिलीं. त्यांत त्यांना वसिष्ठाच्या वंशजांनीं, तद्वत् भृगु नांवाच्या दुसऱ्या एका बुद्धिमान् पुरुषाच्या वंशजांनीं साहाय्य केलें.

त्या काळीं राज्य स्थापन करणाऱ्या पराक्रमी पुरुषांना क्षत्रिय म्हणत आणि यज्ञयाग करणाऱ्या बुद्धिमान् पुरुषांना ब्राह्मण म्हणत. प्रजेला विश् म्हणजे वैश्य अशी संज्ञा असे. ठिकठिकाणच्या प्रजेंत वंश, स्थान, व्यवसाय, इत्यादि कारणांमुळें स्वाभाविकपणें निर्माण झालेल्या नाना जातींचे[५] लोक असत. पण, क्षत्रिय राजे कोणत्याही जातींच्या चालीरीतींत अथवा त्यांच्या देवदेवताविषयींच्या समजुतींत यत्किंचित् ढवळाढवळ करीत नसत.[६] स्वतः शांततेनें राहून, इतरांनाही शांततेनें राहूं द्यावें, हेंच त्या काळीं जीवनाचें मुख्य सूत्र असे.

क्षत्रिय राजे ब्राह्मणांकरवीं मोठमोठे यज्ञयाग करून, वैश्यांस म्हणजे आपल्या प्रजेस त्यांत भाग घेण्यासाठीं पाचारण करीत. येथून तेथून सारे देव एकच आहेत, किंबहुना एकाच महाशक्तिमान् देवाला निरनिराळ्या नांवांनीं संबोधिलें जातें,[७] त्यानेंच सारे प्राणिमात्र व त्यांच्या चालीरीती निर्माण केल्या आहेत, अशा प्रकारच्या व्यापक व उदार विचारसरणीवर यज्ञयागांची उभारणी केलेली असल्यामुळें, वैश्य म्हणजे प्रजा आपआपल्या जातींच्या चालीरीती वा

३. वसिष्ठ हेच एके काळीं यज्ञ करणारे ब्राह्मण होते, असा उल्लेख पञ्चविंश ब्राह्मणांत (१–५) आहे.

४. "यज्ञसंस्थेचा परिणाम समाजाच्या विकासाकडे झाला एवढेंच नव्हे, तर त्यापासून अनेक तऱ्हेचे ज्ञानविषयक आणि समाजघटनाविषयक फायदे झाले."—ज्ञानकोश, प्रस्तावना खंड २, पृष्ठ १९५,

वेदांगांसहित सर्व वैदिक वाङ्मय, त्याचप्रमाणें स्थापत्य, गणित, ज्योतिष, एवढेंच नव्हे तर संगीत, नृत्य, नाट्य यांचीही वाढ यज्ञसंस्थेमुळेंच झालेली आहे.

५. प्रजोत्पादन करणें ही एक नैसर्गिक प्रवृत्ति असून, उत्तम प्रजा निर्माण करावी, असें मानवाला साहजिकपणेंच वाटत असतें. त्यामुळें त्यानें स्वतःवर विवाहाचें बंधन घालून घेतल्यापासूनच जाती स्वाभाविकपणें निर्माण झालेल्या आहेत. जगांतील सर्व प्राचीन राष्ट्रांत जाती होत्या, असें त्यांच्या इतिहासावरून दिसून येतें. भारतांत जातींना जें एक विशेष स्वरूप आलें आहे, त्याला कारण त्याची हजारों वर्षांची अखंड परंपरा, हेंच होय.

६. भारतीय संस्कृतीचें हें एक वैशिष्ट्य आहे. कौटिल्यानें आपल्या अर्थशास्त्रांत (अ. १३–४) याचा उल्लेख केलेला आहे.

७. "एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति ।"

—ऋग्वेद, १–१६४–४६.

देवदेवतांविषयींच्या कल्पना बाजूस ठेवून, त्या यज्ञयागांत हौशीनें भाग घेत असे.

यज्ञयागाचें दृश्य एकंदरींत भव्य आणि गंभीर असे. त्यामुळें त्याकडे प्रजा आकर्षिली जाई. भिन्नभिन्न जातींचे लोक एकत्र येत. यज्ञांत आहुतीमागून आहुति टाकतांना वेगवेगळ्या देवतांचीं नांवें घेऊन, 'अमुकाय स्वाहा, इदं न मम।' (हें मी अमूक अमूक देवाला देत आहें, हें माझें नव्हे.) अशा प्रकारें केलेला घोष ऐकून, उपस्थितांचीं मनें उन्नत होत आणि कळत न कळत, समर्पणबुद्धीचा म्हणजे त्यागाचा ठसा त्यांच्या मनांवर उमटे. त्यामुळें प्रजेच्या म्हणजे वैश्यांच्या मनांत यज्ञयाग व ते करणाऱ्या ब्राह्मण व क्षत्रिय वर्गांबद्दल आदर व आत्मीयता निर्माण होत असे. परिणामीं यज्ञसंस्थेच्या बुडाशीं असलेली उदार व व्यापक विचारसरणी त्यांच्या अंतःकरणांत ठसत जाऊन, त्यांचे वेगवेगळ्या जातींचे जुने आचार-विचार कमी-अधिक प्रमाणांत मागें पडत जाऊन यज्ञसंस्थेमुळें निर्माण झालेले नवे आचार-विचार त्यांनीं ग्रहण केले. अशा प्रकारें यज्ञसंस्थेची पार्श्वभूमि असलेला, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्गांचा एक एकजिनसी समाज यथाकाल निर्माण झाला.

समर्पणबुद्धि अथवा त्यागवृत्ति हेंच मानव जातीच्या उत्कर्षाचें खरें रहस्य आहे. कळत न कळत आपण आपल्या वैयक्तिक सुखसोयी व लहरी समाजाच्या व्यापक हितासाठीं पावलोपावलीं बाजूस सारीत असतों. म्हणूनच समाजाचा गाडा सुरळीतपणें चालू राहातो. त्यागवृत्ति अंगीं बाणली नसती तर तो केव्हांच कोलमडून पडला असता.

अशा रीतीनें त्यागाची शिकवण यज्ञयागांच्या द्वारा प्रजेच्या मनावर बिंबत राहिल्यामुळें, क्षत्रियराजांच्या राज्यांतील लोक व्यापक मनाचे बनले व त्यांची भरभराट झाली. तें पाहून आसपासच्या प्रदेशांतील वन्य व मागासलेले लोक निरनिराळ्या राज्यांत आश्रयासाठीं आले आणि पोटापाण्यासाठीं तेथील लोकांचीं काबाडकष्टाचीं कामें करूं लागले. त्यांना शूद्र[८] म्हणत. त्यांच्यांतही अर्थातच वेगवेगळ्या जाती[९] असत.

शूद्रांच्या आगमनानें क्षत्रियांच्या राज्यांत आतां एका नवीन वर्गाची भर पडली. म्हणजे पूर्वी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ग मिळून झालेला समाज, चार वर्गांचा झाला. ह्या समाजांत वर निर्देश केल्याप्रमाणें वंश, स्थान व व्यवसायभिन्नत्वें करून अर्थातच नाना जातींचे लोक असत, पण सारे लोक पूर्णतया यज्ञाभिमुख असल्याकारणानें, आपआपल्या जातींचा विचार बाजूस ठेवून, केवळ आपल्या वर्गाचा विचार करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत प्रबळ झालेली होती.

पुढील काळांत क्षत्रिय राजांनीं सिंधु नदी ओलांडून थेट कश्यप (कॅस्पिअन) समुद्रापर्यंत आपलीं राज्यें स्थापिलीं आणि ब्राह्मणांनीं त्यांच्याबरोबर जाऊन आपली यज्ञसंस्था व

---

८. शूद्र हा शब्द 'शुच' ह्या धातूपासून झाला आहे. ('शुचेर्दश्च।' उ. २/१९). शुच म्हणजे शोक करणें. त्यावरून दुःखी-कष्टी तो शूद्र, असा अर्थ आहे.

९. जातीची व्याख्या पुढीलप्रमाणें आहे : "ज्या विशिष्ट संघामध्यें जन्मानेंच प्रवेश होतो आणि दुसऱ्या कोणत्याही कारणानें होत नाहीं व ज्या संघांतील लोकांस त्या संघाबाहेर लग्न करतां येत नाहीं, त्या संघास जाति म्हणावें."

—ज्ञानकोश, (ज) पृष्ठ ११४.

आपले यज्ञीय देव तेथपर्यंत पोंचविले.'[१०]

मध्यंतरींच्या काळांत यज्ञसंस्थेची वाढ झपाट्यानें झाली खरी, पण मानवाला समर्पण-बुद्धीची म्हणजेच त्यागवृत्तीची प्रेरणा देणें, हा जो त्यांतील मुख्य तात्त्विक भाग, त्याचा लोप होत गेला व यज्ञयागांच्या केवळ कर्म-कांडाचें प्रस्थ माजलें. यज्ञसंस्थेची ही विकृति इतक्या थराला जाऊन पोंचली, कीं अखेर तिची प्रतिक्रिया म्हणून यज्ञयाग करणारांची अवस्था फुटक्या नावेंतून प्रवास करणाऱ्यां-सारखी आहे.'[११] यज्ञयागांपासून मानवाचें अंतिम ध्येय साध्य होणें शक्य नाहीं असें म्हणणारे उपनिषद् ग्रंथ निर्माण झाले. त्याचप्रमाणें भक्तिमार्गाचा उपदेश करणारा नारायणीय पंथ उदयाला आला.

वरील दोन्ही प्रतिक्रिया यज्ञसंस्थेला जर्जर करीत होत्या. त्याच सुमारास गौतम बुद्धानें तिच्यावर अखेरचा प्रहार केला. त्यामुळें यज्ञसंस्था लुप्त होण्याच्या मार्गाला लागली व तिच्या अनुषंगानें निर्माण झालेले ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ग म्हणजेच समाज, ही कल्पनाही नष्टप्राय झाली.

यज्ञसंस्कृति प्रवृत्तिपर होती. तिच्यामुळें क्षत्रियांच्या राज्यांची भरभराट झाली होती. पण संसार दुःखमय आहे, त्यांत सुख मिळणें शक्य नाहीं, निर्वाण हेंच मानवाचें अंतिम साध्य आहे, ही बुद्धाची शिकवण निवृत्तिपर होती. तिच्यापायीं लोक संसार-पराङ्मुख होऊन सरासर भिक्षु बनूं लागले. त्यामुळें कुटुंबव्यवस्थेला मोठा धक्का बसला आणि तिच्यावर आधारलेला समाज अगदीं खिळखिळीत झाला.

राजा अशोकानें ठिकठिकाणीं कोरविलेल्या लेखांत " मातापितरांची सेवा करा, गुरुजनांना मान द्या, आप्तेष्टांशीं योग्य वर्तन ठेवा, त्यांतच खरा धर्म आहे, असें आग्रहानें म्हटलेलें आहे. वास्तविक पाहातां, बुद्धाचा अनुयायी ह्या नात्यानें, अशोकानें आपल्या लेखांतून बुद्धाचा गौरव व बौद्ध-मताच्या विशिष्ट तत्त्वांचाच प्रसार करायला हवा होता. पण तसें न करतां, सदाचार म्हणजेच धर्म, असें प्रतिपादून, त्याचें पालन करण्याविषयीं प्रजेला आवर्जून सांगण्यासाठीं राजा अशोकाला ठिकठिकाणीं लेख कोरविण्याची आवश्यकता वाटली, त्यावरून बुद्धाच्या शिकवणीमुळें कुटुंबव्यवस्थेंत खूपच बिघाड होऊन लोक एकमेकांशीं योग्य प्रकारें वागेनासे झाले होते व परिणामीं समाजांत अनवस्था निर्माण झाली होती, हें स्पष्ट होतें.[१२]

सर्वांना एका छत्राखालीं आणणारें यज्ञसंस्थेचें बंधन बुद्धाच्या प्रहारामुळें नाहींसें झाल्यानें, समाज आतां सुकाणूं नसलेल्या तारवाप्रमाणें अनिश्चिततेच्या लाटांवर हेलकावे खाऊं लागला होता. अशा स्थितींत हवालदिल झालेल्या लोकांना, 'बुडत्याला काडीचा आधार' ह्या न्यायानें, स्वसंरक्षणार्थ आप-आपल्या जातींना बिलगून राहाण्याशिवाय तरणोपाय नव्हता. त्यामुळें यज्ञसंस्थेनें निर्माण केलेल्या, जात विसरून आपआपल्या वर्गाचा विचार करा, ह्या मनोवृत्तीच्या जागीं, आतां

१०. आशिया-मायनरमध्यें बोगाज किओई ह्या गांवी सापडलेल्या लेखांमध्यें मित्र, इंद्र, वरुण आणि नासत्य ह्या वैदिक देवतांचीं नांवें आहेत. हा लेख खिस्तपूर्व १४०० वर्षांचा आहे, असें मानलें जातें.

११. मुंडकोपनिषद्, १.२.७–११

१२. 'अशोक आणि त्याचे लेख', गुंडोपंत हरिभक्त, पृष्ठ ६२.

केवळ आपल्या जातीचाच विचार करण्याची प्रवृत्ति लोकांत प्रबळ होत गेली.

परिणामीं पूर्वी यज्ञसंस्थेच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेला जो जातिपराङ्मुख व केवळ आपला वर्गच ध्यानांत बाळगणारा, अतएव एकजिनसी असा समाज निर्माण झाला होता, त्याच्या जागीं भारतांत ह्यापुढें एकमेकांशीं तुटकपणें वागणाऱ्या असंख्य भिन्न भिन्न जातींना महत्त्व आलें.

अशोकानंतर भारतावर शक, यवन, वगैरे परकीय टोळ्यांचे हल्ले सुरु झाले. कांहीं काळ त्यांनीं सौराष्ट्रांत व पूर्वेस मथुरेपर्यंत राज्येंही स्थापिलीं. त्यांपैकीं असंख्य लोक बुद्धपंथाचा स्वीकार करून भारतांत स्थायी झाले. त्यामुळें आधींच निर्माण झालेल्या असंख्य जातींच्या खिचड्यांत भिन्न भिन्न वंशांच्या आणखी अनेक नव्या जातींची भरच पडत गेली. नव्या आलेल्या राकट लोकांच्या सान्निध्यानें आपल्या जुन्या वंशपरंपरेंत बिघाड होऊं नये म्हणून, पूर्वी स्थायी झालेल्या जातींनीं आपल्या सभोंवतीं रोटीबेटी व्यवहारांच्या निर्बंधांचे कोट उभारले.[13]

१३. या संदर्भात सुप्रसिद्ध इंग्लिश मानसशास्त्रज्ञ हॅवलॉक एलिस म्हणतो :

"Consciously or unconsciously, sometimes under pretexts that have disguised his motives even from himself, man has always been attempting to improve his own quality, or at least to maintain it. When he slackens that effort, when he allows his attention to be too exclusively drawn to other ends, he suffers, he becomes decandant, he even tends to die out."
—*Morals, Manners and Men*, pp. 1-2.

आजही यू. एस्. ए. मधील २० संस्थानांत निग्रोंशी लग्न करण्याची गोऱ्यांना कायद्यानें बंदी आहे, हें ध्यानांत घेण्यासारखें आहे.

ह्याच काळीं आपआपल्या जातींचें पृथक्त्वानें नियंत्रण करणाऱ्या जातपंचायती प्रबळ झाल्या. त्यांपैकीं कांहीं पंचायती आपआपल्या मुद्रांचीं नाणीं पाडून तीं व्यवहारांत चालवीत. तें ध्यानांत घेतलें असतां, ह्या काळीं जातींना किती महत्त्व प्राप्त झालें होतें, तें दिसून येतें.

मध्यंतरीच्या काळांत बौद्धमताचा प्रसार फार झपाट्यानें झाला होता. पण लवकरच बुद्धानुयायांतही फूट पडली. ती सांधण्यासाठीं कनिष्कानें[14] धर्मसभा बोलाविली. पण तिचा कांहींच उपयोग न होतां, हीनयान व महायान हे पंथमात्र कायमचे विभक्त झाले. त्यानंतर मूळच्या बौद्धमताशीं अत्यंत विसंगत असलेला महायान पंथ वेगानें फोफावला, त्यांतील शून्यवाद बोकाळला आणि त्यांत इतर अनेक वादांची वा मतांची भर पडली. त्यामुळें तर्कटांचा हलकल्लोळ माजून, पाखंड्यांच्या बुजबुजाटानें, आधींच अस्थिरमति बनलेल्या सर्वसामान्य लोकांचा बुद्धिभेद झाला. त्यामुळें श्रद्धेचीं स्थानें पार ढासळलीं, आस्तिक्यबुद्धि लय पावली आणि कर्तव्याकर्तव्याची जाणीव नष्ट होऊन, जीवनमूल्यें धुळीस मिळालीं. परिणामीं आधींच खिळखिळा झालेला समाजाचा गाडा, अगदीं कोलमडून पडण्याची वेळ आली. श्रीशंकराचार्यांनीं ह्या परिस्थितीचें वर्णन "वैनाशिकैः सर्वोलोकः आकुलीक्रियते।"[15] असें केलें तें यथार्थ आहे. ह्या काळाच्या भारताचें तमोयुग असें नांव देणें योग्य होईल. त्याचा इतिहासही अंधारांत आहे!

१४. कनिष्क हा युएची टोळ्यांपैकीं कुशान नांवाच्या टोळीपैकीं एक असून, त्यानें बौद्धपंथ स्वीकारला होता.

१५. सूत्रभाष्य, २-२-२७.

पण ह्या तमोयुगांतूनच प्राचीन यज्ञसंस्कृतीवर अधिष्ठित असलेला आजचा हिंदुधर्म उदयाला आला. ह्यापुढील काळांत महाभारत-रामायण ग्रंथांचा प्रचार जोरानें सुरू झाला, वेगवेगळालीं पुराणें रचण्यांत आलीं आणि धर्मशास्त्र सांगणारे स्मृतिग्रंथ निर्माण झाले.

त्यागानेंच मानवजात अमर होईल,[१६] त्याग नसेल तर आपसांतील कलहांपायीं ती स्वतःचाच नाश करील, ह्या वेदान्त्याच्या शिकवणीवर स्मृतिकारांची निष्ठा होती. एकच आत्मा सर्वभूतीं आहे अशा जाणिवेमुळें ज्याचा अहंकार विरून, जो सर्व प्राणीमात्रांशीं साम्यबुद्धीनें आचरण करतो, असा वेदान्तानें चितारलेला जो आत्मयाजी,[१७] त्यालाच आवाहन करून, स्मृतिकार आपल्या कार्यास प्रवृत्त झाले होते.

केवळ आपआपल्या हितसंबंधांचाच विचार बाळगणाऱ्या व इतरांशीं तुसडेपणानें वागणाऱ्या ज्या असंख्य जाती आतां भारतांत अस्तित्वांत आलेल्या होत्या, त्यांना एका छत्राखालीं आणून, लोकांत आपआपल्या कर्तव्याची जाणीव निर्माण करणें, हेंच स्मृतिकारांपुढें महत्त्वाचें कार्य होतें.

तें सिद्ध करण्यासाठीं सर्व जातींचा इतिहास, त्यांच्या उत्पत्तीसंबंधींच्या दंतकथा,[१८] त्यांचे व्यवसाय व आचारविचार, तद्वत् त्यांची नैतिक व बौद्धिक पातळी ह्या सर्व गोष्टी अत्यंत काळजीपूर्वक ध्यानांत घेऊन, स्मृतिकारांनीं, गुण आणि कर्म ह्यांच्या अनुरोधानें, जातींचे चार वर्ग केले आणि त्या वर्गांना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हीं गुणांच नांवें देऊन, त्यांची प्राचीन परंपरेशीं सांगड घातली आणि प्रत्येक वर्गाचें ध्येय काय व प्रत्येक वर्गानें कोणतीं कर्में करावींत व कोणतीं करूं नयेत, हें निश्चित करून, प्रत्येकानें आपल्या वर्गाला विहित असलेलें कर्म[१९] करण्यांतच त्याचा धर्म आहे व तोच आचरल्यानें त्याला सद्गति मिळेल, असा निर्वाळा दिला.

ह्या नव्या व्यवस्थेला स्मृतिकारांनीं वर्णव्यवस्था असें नांव दिलें. वर्ण ह्या धातूचा अर्थ प्रेरणा देणें असा आहे. वर्णयति म्हणजे प्रेरणा देतो, तो वर्ण. प्रत्येकाला आपलें कर्तव्य करण्याची प्रेरणा देणें, हेंच

---

१६. न धनेन न प्रजया त्यागेनैके अमृतत्वमानशुः।

१७. सर्वभूतेषु चात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।
समं पश्यन्नात्मयाजी स्वाराज्यमधिगच्छति ॥
—मनु, १२-९१.

१८. अशा प्रकारच्या अनेक दंतकथा पुराणांतून दिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, ज्ञानकोश, (क) ३८८-३८९, ४७३; (ख) १७२; (ग) ६२.

१९. जीवात्मा आपल्या बऱ्यावाईट कर्मांनुसार निरनिराळ्या योनींत जन्म घेत असतो, ही कल्पना फार प्राचीन काळापासून भारतांत प्रसृत होती आणि बौद्धवाङ्मयांतील जातक कथांमुळें तर ती ह्या बाबतीं सर्वसामान्य लोकांच्या मनांतही अत्यंत खोलवर रुजलेली होती. त्यामुळें आपला विशिष्ट वर्णांतील जन्म अपघातानें आपल्याच पूर्वकर्मांमुळें प्राप्त झालेला आहे, त्याला आपणच जबाबदार आहोंत, अन्य कोणीही नाहीं, असें सर्वसामान्य माणसें त्या काळीं प्रामाणिकपणें मानीत असत, हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. ह्या वृत्तीचें उत्तम उदाहरण आपल्याला 'मृच्छकटिक' नाटकांत पाहावयास सापडतें. शकारानें चेटाला वसंतसेनेचा खून करावयास सांगितलें, तेव्हां "मागच्या जन्मीं मला पाप केलें, म्हणून ह्या जन्मीं तुमची चाकरी करून पोट भरतों. पण आतां हें पाप करून, पुढच्या जन्माची तयारी करून ठेवीत नाहीं." असें चेटानें शकाराला दिलेलें उत्तर वरील वृत्तीचेंच द्योतक आहे.

स्मृतिकारांच्या वर्णव्यवस्थेचें उद्दिष्ट असल्याकारणानें, तिला दिलेलें वर्णव्यवस्था हें नांव अत्यंत अर्थपूर्ण आहे.[२०]

ह्या व्यवस्थेमुळें कर्तव्याकर्तव्याबाबत दीर्घ कालापासून संभ्रमांत पडलेल्या सर्वसामान्य लोकांस नवीन दृष्टि लाभल्यासारखें झाल्यामुळें त्यांनीं तिचा आनंदानें स्वीकार केला.

ही चतुर्वर्णव्यवस्था निर्माण करतांना स्मृतिकारांनीं कोणत्याही जातींच्या विशिष्ट चालीरीतींत अथवा देवदेवताविषयींच्या समजुतींत तद्वत् त्यांच्या जातपंचायतींच्या व्यवहारांत किंचितही ढवळाढवळ केलेली नसल्यामुळें जातींच्या स्वायत्ततेला जराही धक्का पोंचण्यासारखा नव्हता, हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

अशा प्रकारें स्मृतिकारांनीं निर्माण केलेला चतुर्वर्णाधिष्ठित हिंदुसमाज, जाती कायम राहूनही, एकजिनसी बनल्यामुळें, लोकांच्या जीवनाला वळण लागलें, समाजांत शिस्त आली आणि प्रत्येकजण आपलें कर्तव्यकर्म योग्य प्रकारें करण्यांतच आपला धर्म आहे, असें मानूं लागला. त्यामुळें भारताला चारित्र्याचें चांगलेंच बळ आलें.

भारताला आतां सुवर्णयुग लाभलें. ह्या काळांत समुद्रगुप्तानें दिग्विजय करून, भारतांत साम्राज्य स्थापिलें आणि क्षत्रियांना विहित असलेला अश्वमेध यज्ञ केला. त्यामुळें चतुर्वर्णव्यवस्थेला अखिल भारतांत मान्यता मिळाली. त्यापुढील काळांत तर ती भारतांतच बद्धमूल[२१] झाली असें नव्हे, तर जावा, सुमात्रा, बाली,[२२] चंपा, वगैरे दूरदूरच्या प्रदेशांत प्रसार पावून, तेथील लोकांच्या जीवनाला भारतीय ठशाचें वळण आणि शिस्त लावण्याचें श्रेय तिनें संपादन केलें.

समुद्रगुप्तानंतरच्या सुमारें ५००-६०० वर्षांच्या काळांत, हूणांच्या स्वाऱ्या वगळतां, भारताला परकीय आक्रमकांचा त्रास झाला नाहीं. त्यामुळें चतुर्वर्णव्यवस्थेस अधिकच बळकटी आली.

त्यानंतर सतत ८०० वर्षें मुसलमानांनीं भारतावर सत्ता गाजविली आणि आपला इस्लामी संप्रदाय त्यांच्यावर लादण्यासाठीं जंग जंग पछाडले. पण चतुर्वर्णव्यवस्थेमुळें आलेल्या चारित्र्यबळावर भारतीयांनीं त्यांना कसून विरोध करून, अखेरपर्यंत आपली संस्कृति टिकविली. मुसलमानांचे आचार मलिन आणि विचार दुष्ट होते. त्यांचा संपर्क टाळण्यासाठीं आपआपल्या जातींच्या

२०. वर्ण् (१० प.) – प्रेरणा देणें, हा अर्थ अमरकोश–रामाश्रमानेंही दिलेला आहे. पण तिकडे दुर्लक्ष करून वर्ण म्हणजे रंग हा एकच अर्थ आज कायम घेऊन बसले आहेत. त्याच्या मुळाशी बाहेरून आलेले गोरे आर्य आणि देशील काळे द्रविड यांच्या मिश्रणानें वेगवेगळ्या जाती निर्माण झाल्या, ही पाश्चात्य पंडितांनीं आपल्या डोक्यांत भरविलेली कल्पनाच आहे. पण त्यापायीं वर्णव्यवस्थेचा खरा अर्थ आपणास समजला नाहीं आणि वर्ण व जात दोन्ही एकच, असा व्यर्थ घोटाळा मात्र निर्माण झाला आहे.

२१. समुद्रगुप्ताच्या (इ. स. ३३०-३७५) अश्वमेध यज्ञानंतर कुमारगुप्ताने (इ. स. ४११-४५५), त्यानंतर पहिल्या पुलकेशीने (इ. स. ५५० च्या सुमारास) व शेवटी गुप्तांपैकी आदित्यसेन याने (इ. स. ६४८ च्या सुमारास) अश्वमेध केल्याचें इतिहासांत नमूद आहे.

२२. चतुर्वर्णांची भावना बलिद्वीपांत अजूनही पाहावयास सापडते. "तेथें चातुर्वर्ण्य भारतीय समाजापेक्षां अधिक प्राचीन स्वरूपांत सापडतें व तें चातुर्वर्ण्याच्या मूळ कल्पनेस धरून आहे."

—ज्ञानकोश, प्रस्तावना खंड १, पृष्ठ २००.

भोवतीं पूर्वी शक-यवनांच्या काळीं उभारलेले रोटी-बेटी व्यवहारांच्या निर्बंधाचे तट, भारतीयांना आतां अधिक मजबूतच करावे लागले.[23] पण त्यामुळें जातीजातींत विग्रह माजून, त्यापायीं भारतीयांनीं एकमेकांचीं डोकीं फोडल्याचें एकही उदाहरण इतिहासांत नमूद नाहीं. त्याचें सारें श्रेय जातींना सूज्ञपणें चार वर्णांत बसवून, त्यांना कर्तव्यतत्पर बनविणाऱ्या स्मृतिकारांनाच दिलें पाहिजे.

मुसल्मानांनीं आपला पंथ भारतीयांवर जबरदस्तीनें लादण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या मागून सत्ताधीश झालेल्या ब्रिटिशांनीं तसें न करतां, उलट, तुमचे वेद म्हणजे बाल्यावस्थेंतील मानवाची बडबड, तुमचीं पुराणें म्हणजे भाकडकथा आणि तुमच्या एकंदर चालीरीती म्हणजे वेडगळ कल्पनांची गुंताळी, असें भारताच्या तरुण पिढीला अत्यंत धूर्तपणें पटवून, तिच्या मनांत स्वतःच्या संस्कृतीबद्दल तिरस्कार निर्माण केला. त्यामुळें सुशिक्षित लोकांनीं त्या संस्कृतीचें प्रधान अंग असलेली चतुर्वर्ण-व्यवस्था झुगारुन दिली आणि अशा प्रकारें तिचें बंधन नाहीसें झाल्यानें, आपआपल्या जातीपुरताच विचार करण्याची प्रवृत्ति लोकांत बळावली.

भारतीयांत फूट पाडण्याची कोणतीही संधि न गमावणाऱ्या ब्रिटिशांनीं अर्थातच ह्या परिस्थितीचा पुरेपूर फायदा करून घेतला आणि लोकांत जातीय भावना प्रज्वलित करून जातिद्वेषाचा वणवा देशभर पसरविला.

पण अशा परिस्थितींतही स्वातंत्र्याचा संग्राम सुरू होतांच, त्यांत भाग घेण्यासाठीं लोक आपल्या जातीय भावना विसरून बिनधोकपणें पुढें आले आणि अखेर त्यांनीं ब्रिटिशांना सातासमुद्रांपलीकडे घालवून दिलें, हा इतिहास अजून ताजा आहे.

ब्रिटिश लोक गेले, भारत स्वतंत्र झाला. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोणतेंही निश्चित व वास्तव ध्येय लोकांपुढें ठेवलें गेलें नाहीं. त्यामुळें लोक साहजिकच किंकर्तव्यमूढ बनले आणि ब्रिटिश अंमलाखालीं आधींच त्यांचा बुद्धिभेद झालेला असल्यामुळें, स्वातंत्र्य मिळालें, तरीही भारतांत मानसिक अराजकता व गोंधळ माजलाच. स्वार्थी लोकांनीं ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन, स्वातंत्र्याच्या संग्रामांत मागें पडलेल्या जातीय भावना पुन्हा प्रज्वलित केल्या आणि त्यांपायीं निर्माण झालेल्या द्वेषाग्नीचा वणवा पुन्हा एकदा साऱ्या देशभर पसरविला.

त्या वणव्याची झळ लागतांच, जाती ह्याच आपल्या सर्व दुःखांना कारण आहेत, त्यांच्यापायींच आपण परतंत्र्यांत होतों, त्या घालविल्या पाहिजेत, ही जुनी भाषा आतां पुन्हा सुरू झाली आहे. अशा वेळीं जातींच्या मागें असणारी प्राचीन काळापासूनची वरील पार्श्वभूमि लक्षांत घेणें अवश्य आहे.

प्राचीन काळीं क्षत्रिय राजांनीं आपल्या राज्याच्या सीमा कॅस्पिअन समुद्रापर्यंत नेऊन भिडविल्या आणि आपली यज्ञसंस्कृति तेथपर्यंत पोंचविली, त्या वेळीं त्यांच्या राज्यांत अनेक जाती अस्तित्वांत होत्या. नंतर मध्ययुगीन काळांत भारतीय संस्कृतीचा प्रसार जावा-सुमात्रापर्यंत करण्यांत आला,

---

23. "Personal dirtiness is the real and permanent dividing line of classes. The instinctive physical shrinking of the clean person from the dirty person is profound and inevitable.... There is no social equality between the clean and the dirty."
—Havelock Ellis, *Morals, Manners and Men*, pp. 87-88.

त्या वेळींही भारतांत अनेक जाती होत्या. अलीकडच्या काळांत मुसल्मानी सत्तेशीं पुरीं ८०० वर्षें सतत विरोध करून आपण आपली संस्कृति अबाधित राखली, तेव्हांही जाती होत्याच. आणि अगदीं काल-परवां ब्रिटिशां-सारख्या एका जबरदस्त सत्तेचें जूं आपण झुगारून दिलें, तेव्हांही त्या जाती अस्तित्वांत होत्याच ना ! मग तेव्हां जर त्या अपकारक ठरल्या नाहींत, तर आतांच त्या तशा कां ठराव्यात !

खरें म्हणजे जाती निसर्गजन्य आहेत, तर जातीय भावना बुद्धया निर्माण केलेल्या असतात.[२४] जातींच्या मागें निसर्गाचा क्रम आहे, तर जातीय भावनांच्या मागें स्वार्थसाधु लोकांच्या कारवाया आहेत. जाती खरोखरी अपकारक नसून, लोकांच्या मनांत निर्माण केलेल्या जातीय भावना अपकारक आहेत. राष्ट्राचें जें अपरिमित नुकसान होत आहे, तें जातींमुळें नसून, जातीय भावनांपायीं होत आहे.

जातीय भावनांपायीं राष्ट्राची हानि होत आहे, म्हणून जाती नाहींशा करा, असें म्हणणें, म्हणजे प्रांतीयता व भाषाविग्रह ह्यांच्यापायीं राष्ट्राची हानि होत आहे, म्हणून प्रांत व भाषाच नाहींशा करा, असें म्हणण्यासारखेंच आहे.

जातीय भावना नाहींशा करण्याचा खरा मार्ग, जाती नाहींशा करणें हा नसून, सर्व जातींना एका छत्राखालीं आणण्यासाठीं समर्थ असणारें निश्चित व वास्तव असें सामुदायिक ध्येय लोकांपुढें ठेवणें, हाच आहे. तसें केल्याशिवाय भारताला पुन्हा ऊर्जितावस्था येणें शक्य नाहीं.

24. "Hatred and prejudice are not born in us but are built into us. They are mental attitudes cultivated and not instinctive. They are the results of training and instruction."

—Dr. Radhakrishnan: *Occasional Speeches and Writings*, p. 529.

हें डॉ. राधाकृष्णांचें म्हणणें भारतानें आपल्या हृदयपटलावर कोरून ठेवणें आज अवश्य आहे.

## इथें तर चोरांचा सुकाळ

एकदा एका मुसाफरानें सायंकाळ झाली म्हणून आपलें घोडें एका रस्त्यावरील खाणावळीच्या बाहेर झाडाशीं बांधलें आणि आपण आंत गेला. भोजन वगैरे करून ती रात्र त्यानें तेथें विश्रांति घेतली.

सकाळीं नास्तापाणी करून तो बाहेर आला आणि पाहातो तो झाडापाशीं घोडें नाहीं ! तें पाहून तो मटकन् खालीं बसला आणि शोकानें आपलें ऊर बडवूं लागला.

रस्त्यानें जाणारे येणारे लोक लगेच त्याच्याभोंवतीं गोळा झाले आणि "असा कसा रे वेड्यासारखा घोडा बाहेर बांधून ठेवलास ? इथें तर चोरांचा सुकाळ आहे." असें म्हणून जो तो त्याला मूर्खांत काढूं लागला.

बिचाऱ्या मुसाफरानें मुकाट्यानें लोकांचे ते बोल ऐकून घेतले व मग स्वतःशींच तो मोठ्यानें म्हणाला, "काय हो हे लोक, घोडा बाहेर बांधला म्हणून मला मूर्खांत काढतात; पण तो नेणाऱ्या चोराविरुद्धमात्र कोणी एक अक्षरही काढीत नाहीं..."

जग हें असें आहे !

—खलील जिब्रानच्या गोष्टीवरून

# पळतां आकाश थोडें

एकदा क्षीरसागरीं शेषावर पहुडलेले भगवान् श्रीविष्णु लक्ष्मीला म्हणाले, "लक्ष्मी, मी थोडा वेळ वामकुक्षी करतों. मला जर तेवढ्यांत कुणी त्रास द्यायला आलं, तर तूं ह्या सुदर्शनचक्राचा बेलाशक उपयोग कर."

असें म्हणून भगवान् स्वस्थ झोपीं गेले.

इकडे भूतलावर त्या काळीं कोठल्यातरी रोगाची साथ आली होती. त्यामुळें बिचाऱ्या अश्विनीकुमारांचे नुसते दिवसच नव्हत, तर रात्रीच्या रात्री रोग्यांना तपासण्यांत आणि औषधपाणी देण्यांत जात होत्या. शेवटीं शेवटीं त्यांना इतका थकवा आला, कीं रोग्यांना तपासतांना त्यांनीं थोटेंच काम देईनाशीं झालीं. तेव्हांमात्र त्यांनीं थोडा वेळ विश्रांति घेण्याचें ठरवलें. पण अश्विनीकुमारांना अशी विश्रांति सरळ कोण घेऊं देणार ? तेव्हां आपल्याला कोणीं ओळखूं नये, म्हणून मधमाशीचें रूप धारण करून, ते सरळ क्षीरसागरीं भगवान् श्रीविष्णु होते, तेथें गेले.

श्रीविष्णूंच्या आज्ञेनुसार लक्ष्मी त्यांच्या भोवतीं डोळ्यांत तेल घालून पहारा करीत होती. एखादी कीडमुंगीही तिच्या नजरेंतून सुटणें शक्य नव्हतें. मग मधमाशी कसली सुटते ? ती येत असलेली पाहून लक्ष्मीनें तिच्यावर सुदर्शन फेकलें.

सुदर्शन मागें लागतांच बिचाऱ्या अश्विनीकुमारांना आपलें खरें रूप प्रगट करणें भागच पडलें. सुदर्शनापासून स्वतःचा बचाव करतां करतां त्यांना पळतां आकाश थोडें झालें.

ह्या धामधुमीनें भगवान्‌मात्र जागे झाले. काय प्रकार घडला आहे, तें तावडतोब लक्षांत येऊन, त्यांनीं सुदर्शन स्वतःच मागें घेतलें.

मग सर्वत्र शांतता झाल्यावर श्रीविष्णु रागारागानें लक्ष्मीस म्हणाले,

"लक्ष्मी, तूं हें काय केलंस ? अश्विनीकुमारांसारख्या माझ्या लोकहिततत्पर भक्तावर तूं केवढा मोठा अन्याय केलास ?"

बिचारी लक्ष्मी भगवंतांचे बोल निमूटपणें ऐकून घेत होती. ती दुसरें करणार तरी काय ?

रागाच्या भरांत श्रीविष्णु तिला अद्वातद्वा बोलले. कधीं पडूं नयेत असे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले. पण लक्ष्मीनें हूं कीं चूं केलें नाहीं. तिनें मुकाट्यानें सारें ऐकून घेतलें.

थोड्या वेळानें भगवान् शांत झाले. तेव्हां लक्ष्मीला टाकून बोलल्याबद्दल त्यांचेंच मन त्यांना खाऊं लागलें आणि ते तिला म्हणाले, "लक्ष्मी, क्षमा कर हं. माझ्या तोंडून तसले शब्द कसे बाहेर पडले, हें माझं मलाच कळत नाहीं."

इतका वेळ अगदीं निमूट राहिलेली लक्ष्मी आतांमात्र हसत म्हणाली, "महाराज, आपल्याला इतकं वाईट वाटायला नको. कारण हा सारा संगतीचाच परिणाम आहे बरं !"

तें ऐकून श्रीविष्णु चांगलेच बुचकळ्यांत पडले. ते म्हणाले, "लक्ष्मी, तुला म्हणायचं आहे तरी काय ! अग, इथें तुझ्याशिवाय मला दुसऱ्या कुणाची संगत आहे ?"

लक्ष्मीनें किंचित् स्मित करून उत्तर दिलें,

"महाराज, सारा वेळ आपण ह्या शेषावर पहुडलेले असतां आणि त्याच्या जिव्हेंत तर जालीम विष आहे. तेव्हां त्याच्या संगतीनें जर आपण एखाद्या वेळीं गरळ ओकलात, तर त्यांत आश्चर्य कसलें ?"

हें ऐकून श्रीविष्णु चुप्पच झाले. त्यावर ते बोलणार तरी काय ?

म्हणूनच नारदभक्तिसूत्रांत म्हटलें आहे:

'दुःसंगः सर्वथैव त्याज्यः ॥ ४३ ॥

# विचार करण्यासाठीं गोष्ट

बेबीला एका 'कॉनव्हेंट' शाळेंत घातलें होतें. ती घरीं आल्यावर आईला रोज नवे नवे गमतीचे प्रश्न विचारी.

एके दिवशीं ती आईला म्हणाली, "मम्मी, आज आमची 'मदर' म्हणत होती, कीं देव एकच आहे. पण तूं तर नेहमीं राम, मारुती, कृष्ण, अशीं कितीतरी देवांचीं नांवं घेत असतेस. मग मम्मी, खरं काय! देव एकच आहे, कीं पुष्कळ आहेत?"

आई थोडा वेळ विचार करून बेबीला म्हणाली, "बेबी, तुझं नांव काय?"

बेबी म्हणाली, "अय्या मम्मी, माझं नांव काय विचारतेस? उषा. सकाळीं जन्म झाला म्हणून माझं नांव उषा."

त्यावर आई तिला म्हणाली, "हं, उषा, पण तुला ठाऊकच आहे, कीं तुझं पाळण्यांतलं नांव गोदावरी आहे. तुझ्या आजीचं नांव होतं तें. तिची आठवण म्हणून तुझ्या आजोबांनीं तें नांव मुद्दाम ठेवलं. पण त्या जुन्या नांवाला लोक हसतील, म्हणून मीं तें बदलून उषा केलं. पण हीं दोन-दोन नांवं असूनही, सारीं तुला म्हणतात बेबीच."

बेबी शांतपणें आईचें भाषण ऐकत होती. ती मधेंच म्हणाली, "आई, काल तूं रागांत मला भवानी म्हटलंस, तें खरं का ग?"

बेबीची आई तिचें कौतुक करीत तिला म्हणाली, "तेवढं बरं लक्षांत ठेवलंस. तूं मस्ती करत होतीस, म्हणून मीं तसं म्हटलं. पण जाऊं दे तें. तुझीं एकटीचींच इतकीं नांवं आहेत, खरं ना? अग, तसंच आहे देवाचं. देव तसा एकच असला, तरी लोक त्याला आपआपल्या मर्जीप्रमाणें वेगवेगळीं नांवं देतात. आलं ना लक्षांत?"

बेबीचें समाधान झाल्यासारखें दिसलें.

पुढें कांहीं दिवसांनीं नारळी पौर्णिमा आली. रविवार होता तो. सुट्टीचा दिवस आणि सणही. म्हणून बेबीच्या आईनें कांहीं मंडळींना जेवायला बोलावलें होतें. त्यांत तिचे, म्हणजे बेबीच्या आईचे, गुरुजीही होते. गुरुजी नुकतेच मॉस्कोचा दौरा करून आले होते.

जेवायला सुरुवात करण्यापूर्वी गुरुजींनीं एक वाटी मागून घेतली आणि त्यांत आपल्या चित्राहुति घालून व पाणी सोडून त्यांनीं 'वदनीं कवळ घेतां'[1] हा श्लोक म्हटला आणि मग 'जय जय रघुवीर समर्थ' असें मोठ्यानें म्हणून देवाला नमस्कार केला. इतर सर्वांनींही तसेंच केलें.

बेबी हें सर्व निमूटपणें पाहात होती. तिनेंही इतरांबरोबर 'जय जय रघुवीर समर्थ' वगैरे कसेंबसें म्हटलें, पण नमस्कार न करतां आपला उजवा हात प्रथम छातीला, मग दोन्ही दंडांना व शेवटीं कपाळाला लावून, खिस्त्यांप्रमाणें क्रॉसची खूण केली.

सारी मंडळी तें पाहून चुप्पच झाली. बेबीच्या आईनें मात्र खरोखरच आपल्या कपाळाला हात लावला होता. बिचाऱ्या बेबीला आपलें काय चुकलें तें कळेना. पण ती भयंकर ओशाळली.

कांहीं क्षण कोणीही बोललें नाहीं. मग बेबीची आईच गुरुजींना म्हणाली, "सर, पाहिलंत ना? ह्या बेबीचं शिक्षण म्हणजे माझ्यापुढें एक मोठा 'प्रॉब्लेम' आहे."

---

१ वदनीं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें।
सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें॥
जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्ण ब्रह्म।
उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म॥

गुरुजी क्षणभर विचार करून म्हणाले, "तो 'प्रॉब्लेम' अगदीं सहज सुटण्यासारखा आहे."

बेबीच्या आईनें म्हटलें, "तो कसा काय?"

गुरुजींनीं उत्तर दिलें, "तुमच्याच देवांत त्या ख्रिस्ताला आणून बसवा म्हणजे झालं. मग नमस्कार केला काय आणि क्रॉस केला काय, दोन्ही सारखेच. आज ह्या 'कॉनव्हेंट' शाळांतून आपल्या मुलांमुलींचं जें हळूहळू ख्रिस्तीकरण चालू आहे, तें थांबवण्याचा हा एकच मार्ग मला तरी दिसतो."

गुरुजींचें म्हणणें सर्वजण लक्षपूर्वक ऐकत होते. गुरुजी पुढें म्हणाले, "तशानें हिंदूंचं ख्रिस्तीकरण तर थांबेलच, पण शिवाय ख्रिस्तांच्या हिंदुकरणाला मदत होईल."

ही गोष्ट बेबीच्या आईनें स्वतःच आम्हांला सांगितली, ती विचार करण्यासारखी आहे.

ह्याच संदर्भांत आम्हांला एक फार जुनी गोष्ट आठवते, ती अशी—

बंगालमध्यें इंग्रजी शिक्षणाला नुकतीच सुरुवात झाली होती. राय घराण्यांतील एका बड्या जमीनदारानें आपल्या मुलांना इंग्रजी शिकवण्याकरतां एका पाद्र्याला नेमलें होतें.

मुलांना इंग्रजी शिकवतांना हा पाद्री विपयान्तर करून, ख्रिस्ताच्या लीला रसभरीत वर्णनें करून सांगत असे. मुलांना काय, त्यांतही मौज वाटे. मुलांचें शिक्षण अशा प्रकारें चालू असतांना तेथें बाजूलाच रायबाबूंची वृद्ध माता माळ ओढीत बसलेली असायची. तीही ख्रिस्ताच्या लीला मोठ्या तन्मयतेनें ऐके.

पाद्री मोठा धूर्त होता. मिशनरीच तो! म्हातारीही आपल्या गोष्टींत रमते, त्या ऐकून कधीं कधीं तिच्या डोळ्यांतून अश्रुही वाहूं लागतात, हें पाहून त्याला गोष्टी सांगायला अधिकच उत्साह येई.

एके दिवशीं आपल्या गोष्टीनें म्हातारीचें मन द्रवलें आहे असें पाहून, तो तिला म्हणाला, "आजी, येशूच्या कथा तुम्हांला इतक्या आवडतात, तर मग तुम्ही बातिस्मा कां घेत नाहीं?"

पाद्र्याचा हा प्रश्न ऐकून आजीबाईनीं शांतपणें उत्तर दिलें, "बाबा रे, माझ्या कृष्णाच्या गोकुळांतल्या लीला मला ठाऊक होत्या. पण त्यानें तिकडे तुमच्या देशांत जाऊन, तेथेंही तशाच लीला दाखवल्या, त्या मला ठाऊक नव्हत्या. म्हणून मी तुझ्या गोष्टींत इतकी रमतें."

हें उत्तर ऐकून पाद्री थंडच झाला. त्या दिवसापासून तो रायबाबूंच्या मुलांना इंग्रजी शिकवायला आला नाहीं, हें सांगायलाच नको.

## राजांच्या दरबारांतून...

'सत्प्रवृत्तींची उपासना वा वाढ ऋषींच्या आश्रमांतून होत असते. राजांच्या दरबारांतून नव्हे.'

—वामनाची गोष्ट, पृष्ठ ६२

## राजाचं बल...

'...प्रजेची भोगासक्ति जितकी वाढेल तितकी ती प्रजा मनानें दुबळीही अधिक होईल. महाराज, प्रजेचं दौर्बल्य हेंच राजाचं बल.'

—वामनाची गोष्ट, पृष्ठ ३७

करतों, माझी कुठें चूक झाली तर सांगा."

हें ऐकून परमेश्वरानें त्याला सांगितलें, "ह्या बाजूलाच असलेल्या पिंपळाच्या झाडाखालीं बसून तूं आपलं अध्ययन सुरू कर. तुझी चूक होईल तेव्हां वृक्षाचं एक पान गळून खालीं पडेल."

त्याप्रमाणें ब्रह्मदेव झाडाखालीं अध्ययन करण्यासाठीं बसला. वेदपठन पूर्ण होईपर्यंत झाडाचें एकही पान गळणार नाहीं असें ब्रह्मदेवाला वाटलें होतें. परंतु त्यानें पाठ म्हणण्यास प्रारंभ करितांक्षणींच त्या वृक्षावरील सर्वही पानें एकदम गळून पडलीं !

हें पाहून ब्रह्मदेवाला अतोनात आश्चर्य वाटलें आणि लगेच परमेश्वराकडे जाऊन तसें होण्याचें कारण तो त्याला विचारूं लागला. पण परमेश्वरानें "तूं प्रारंभ कसा केलास ?" असें विचारतांच, आपण पाठास सुरुवात करण्यापूर्वीं प्रणवाचा ( म्हणजे 'ॐ' ह्या शब्दाचा ) उच्चार केला नव्हता हें लगेच त्याच्या ध्यानीं आलें व त्या भयंकर चुकीमुळें सारीं पानें गळून पडलीं तें लक्षांत येऊन ग्रंथारंभीं मंगल शब्द योजण्याची प्रथा फार प्राचीन काळापासून भारतांत चालू होती. 'ॐ' आणि 'अथ' हे दोन शब्द तर मांगलिक म्हणून प्रसिद्धच आहेत. श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या भावार्थ-दीपिकेची सुरुवात 'ॐ' नें केलेली आहे. 'श्रीगणेशाय नमः।' असें लिहिण्याचीही वहिवाट जुन्या पोथ्यांतून आहे. कित्येक कवींनीं नुसतें 'श्री' हें अक्षर प्रथम योजिलेलें आहे.

व्याकरणकार पाणिनि महर्षींनीं तर 'वृद्धि' ह्या शब्दानेंच मंगल साधलेलें आहे आणि तसें करून भाषा ही नेहमीं वृद्धिंगत होत असते ह्याचीही आठवण करून दिली आहे.

सारांश, अध्ययनापूर्वीं अथवा ग्रंथारंभीं मंगल करणें, पूर्वीं अत्यंत अवश्य समजलें जात असे. शिक्षणास सुरुवात करितांना मुलांच्या पाटीवर "श्रीगणेशाय नमः" असें लिहिण्याची प्रथा आपल्यांत पूर्वीं होती, त्याचें स्मरण कांहीं लोकांना अजूनही असेलच. त्यांतही मंगल साधण्याचीच कल्पना होती.

## व्याकरणाचा पाठ

रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे। रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः॥ रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं। रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर॥ ३७॥

श्रीरामरक्षास्तोत्रांतील वरील श्लोकांत कवीनें ( बुधकौशिक ) राम ह्या नामाचीं विभक्तीचीं एकवचनी सर्व रूपें दिलीं आहेत.

वर्गणी पाठविण्याचा पत्ता—
कर्नाटक प्रकाशन संस्था
कर्नाटक हाऊस
चिराबाजार, मुंबई २

## सद्धर्म प्रकाशन

**सद्यांच्या विकट परिस्थितींतून बाहेर पडण्याचा एकमेव मार्ग दाखविणारीं अद्वितीय प्रकाशनें.**

लेखक–गुंडोपंत हरिभक्त

### समुद्रमंथनाची गोष्ट
महाप्रयासानें मिळविलेलें स्वातंत्र्यरूपी अमृत जतन कसें करावें, हें सांगणारी कूर्मावताराची गोष्ट. ५० पैसे

### प्रल्हादाची गोष्ट
खऱ्या एकनिष्ठतेची प्रतीति कशी येईल हें स्पष्टपणें सांगणारी वराह व नरसिंह अवताराची गोष्ट. १ रुपया

### परशुरामाची गोष्ट
स्वार्थाचा लवलेश न ठेवणाऱ्या परशुराम अवताराचें खरेखुरें रहस्य. १ रुपया

### ब्रह्मदेवाची गोष्ट
परमेश्वर सर्वांभूतीं आहे ही जाणीव निर्माण करणारी हंसावताराची गोष्ट. ७५ पैसे

### पुंडलिकाची गोष्ट
सेवाधर्माचें महत्त्व पटविणारी अतिप्रभावी कथा. २५ पैसे

### सत्यव्रताची गोष्ट
सन्मार्गानें जाणाऱ्या प्रयत्नशील माणसाला परमेश्वर कसें साहाय्य करतो हें सांगणारी मत्स्यावताराची रहस्यपूर्ण गोष्ट. ८० पैसे

### वामनाची गोष्ट
ध्येयसिद्धीसाठीं गरजा कमी करून त्यागवृत्तीनें कसें राहावें हें आग्रहानें सांगणारी बटु वामनाची गोष्ट. १ रुपया

### अभंग–गीतें
ज्ञानेश्वर-रामदास-तुकाराम ईश्वरी साक्षात्काराचा निर्मळ आनंद देणारे २१ संतांचे ८७ सार्थ अभंग. १ रुपया

### ऋग्वेदाची ओळख
शांतीसाठीं मानवाला त्यागाचा संदेश देणाऱ्या ऋग्वेदाची सोप्या भाषेत ओळख करून देणारें पहिलेंच पुस्तक. तीन रुपये

## कर्नाटक प्रकाशन संस्था

कर्नाटक हाउस, गिरगावबाजार, मुंबई



मुद्रक : कृष्णा शं. करवार, मोहन मुद्रणालय, शिवडी बंदर रोड, शिवडी (पूर्व) मुंबई १५ डीडी
प्रकाशक : बा. ग. ढवळे, कर्नाटक प्रकाशन संस्था, कर्नाटक हाउस, गिरगावबाजार, मुंबई २ बीआर